पुणे
सोमवार,
२ जून
२००८

लोकमत

# टाऊनशीपसाठी एक चटईक्षेत्र निर्देशांक



■ मगरपट्टा सिटीच्या 'नांदेड सिटी टाऊनशिप' प्रकल्पाचे उद्घाटन रविवारी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी (डावीकडून) अजित पवार, उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, ऊर्जामंत्री दिलीप वळसे-पाटील, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, पवार, मगरपट्टा सिटीचे सतीश मगर व इतर.

## मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची घोषणा

**पुणे, दि. १ (प्रतिनिधी) :** नियोजनशून्य शहरांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना पायबंद घालण्यासाठी नियोजनात्मक टाऊनशीपची गरज आहे. त्याला प्रोत्साहन म्हणून त्यासाठी सध्या असलेल्या अर्ध्याऐवजी एक चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आज येथे दिली.

मगरपट्टा सिटीतर्फे सिंहगड रस्त्यावरील नांदेड फाट्याजवळ उभारण्यात येत असलेल्या सातशे एकर जमिनीवरील 'नांदेड सिटी टाऊनशीप'च्या भूमिपूजन समारंभप्रसंगी ते बोलत होते. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते त्याचे भूमिपूजन झाले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, पालकमंत्री अजित पवार, ऊर्जामंत्री दिलीप वळसे पाटील, वनमंत्री बबनराव पाचपुते, महापौर राजलक्ष्मी भोसले, खासदार सुप्रिया सुळे, आमदार कमल ढोलेपाटील, मगरपट्टा सिटीचे सतीश मगर आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, "शेतकऱ्यांनी एकत्र येऊन टाऊनशीप निर्माण ▶▶ पान २ वर

### यात आमचं काही नाही...

*मगरपट्टा सिटी हा टाऊनशीप प्रकल्प शरद पवारांचा आहे असे अनेक ठिकाणी बोलले जाते. दिल्लीतील एका नियतकालिकाने मगरपट्टा सिटी टाऊनशीपनंतर आता पवारांची दुसरी नांदेड सिटी टाऊनशीप उभा राहात असल्याबाबत बातमी छापल्याचे पवार यांनी याप्रसंगी सांगितले. ते म्हणाले की, वास्तविक आमची कोणाचीही त्यामध्ये भागिदारी नाही. काही पत्रकार अपुऱ्या माहितीच्या आधारे अशा बातम्या देत आहेत. असे असताना देखील महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी या टाऊनशीपविषयी चांगले लिहिले आहे.*

## टाऊनशीपसाठी आता एक चटईक्षेत्र निर्देशांक

(पान १ वरून) केल्याने तो उद्योजक बनतोय. त्यांच्यामध्ये होत असलेले हे स्थित्यंतर स्वागतार्ह आहे. गुंठेवारी पद्धतीत अमर्याद जमिनीचा वापर होत असल्याने त्याला सरकारने पायबंद घातला आहे. त्यामुळे येथील शेतकरी यापुढे एकर व गुंठ्याऐवजी आता 'एफएसआय'ची भाषा बोलेल. मगरपट्टा सिटी पॅटर्न हा पुण्यापुरता मर्यादित न राहता राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरेल."

उपमुख्यमंत्री पाटील म्हणाले, "अन्नधान्याच्या विक्रीमध्ये दलाल तर, शेतजमीन खरेदी करून त्यावर घरे बांधून त्याच्या विक्रीतून बिल्डर्स मोठे होत असताना शेतकऱ्याला मात्र फारसा फायदा होत नाही. त्यामुळे बिल्डर्सला समांतर असलेल्या या शेतकऱ्यांच्या मालकीच्या टाऊनशीप उभा राहिल्याने तो उद्योजक बनला आहे. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्य सरकारला विविध पातळीवर निर्णय घ्यावे लागतील." शहरांची संख्या आणि त्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने भविष्यात शेतीला पाण्याची टंचाई भासण्याची भीती व्यक्त होत असल्याचे सांगून पालकमंत्री पवार म्हणाले की, त्यामुळे पर्यावरणपूरक व नियोजनयुक्त टाऊनशीपची आवश्यकता आहे. शहरांनी त्यांच्या पाण्याची सोय स्वतः करण्याची वेळ आली असल्याने स्वतःची धरणे बांधली पाहिजेत. तरच पाण्याचा प्रश्न सुटेल व टाऊनशीपमुळे वाहतूक कोंडी व पर्यावरणाचे प्रश्न सुटतील.

### गरिबांना घर द्या : शरद पवार

टाऊनशीपसाठी एक चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा राज्य सरकारचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगून केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी पुढील काळात हा निर्देशांक दीड करावा आणि ज्यांना निवारा नाही अशा गरिबांना त्या ठिकाणी घर द्यावे अशी सूचना केली. शेतकरी एकत्र येऊन होत असलेल्या टाऊनशीपमुळे शेतकरी उद्योजक बनत आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व सरकारवरील ताणही याच्यामुळे कमी होत असल्याचे पवार म्हणाले.

**वाळू लॉबी...** बांधकामासाठी वाळूचा उपसा केल्याने रस्ते मोठ्या प्रमाणात खराब होत आहेत. वाळूच्या लिलावातून मिळणाऱ्या पैशापेक्षा अधिक पैसे या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता खर्च होत आहेत. शिवाय वाळुवाल्यांची लॉबी दहशत निर्माण करीत असून वाळूला पर्याय निर्माण झाल्याने वाळू उपशाबाबत सरकार कडक धोरण स्वीकारणार असल्याचे मुख्यमंत्री देशमुख यांनी सांगितले. तर, पालकमंत्री पवार यांनी वाळुवाल्यांचे अंडरवर्ल्डसारखे वर्ल्ड निर्माण होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली.